Impact Factor – 3.452

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2018

SPECIAL ISSUE-XXVIII

# सामाजिकशास्त्रातील संशोधन

## सद्यस्थिती व दृष्टीकोन




**अतिथी संपादक :**

**डॉ. भाऊसाहेब गमे**

प्राचार्य,

महात्मा गांधी विद्यामंदिरचे कला व वाणिज्य महाविद्यालय,

येवला, जि. नाशिक (महाराष्ट्र)

**मुख्य संपादक :**

**डॉ. धनराज धनगर**

सहा. प्राध्यापक

महात्मा गांधी विद्यामंदिरचे कला व वाणिज्य महाविद्यालय,

येवला, जि. नाशिक (महाराष्ट्र)

RESEARCH JOURNEY

MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :

- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned by CamScanner

# INDEX



| No. | Title of the papers Authors | | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Ethical Issues in Research | Dr. Rajendra Dhande | 05 |
| 2 | Nature & Limitations of Research in Economics | Dr. G. D. Kharat | 14 |
| 3 | Types of Research and the Impotance of Computers in Research | Dr. N.N.Gadhe | 19 |
| 4 | Business Research | Dr. S. B. Sanap | 23 |
| 5 | Writing an Ideal Research Report | Dr. S. D. Khairnar | 26 |
| 6 | Research in social sciences with special reference to management discipline in Indian business management context | Dr. Sunil Joshi | 29 |
| 7 | Role of Librarians and Information Science Professional in the Establishment of Open Access Institutional Repositories | Mr. A. P. Bagul | 35 |
| 8 | Reserch Methods in Political Science | Mr. Prakash Dunbale | 39 |
| 9 | The Contribution of Social Science in Literary Research | Mr. K.B.Gaikwad | 41 |
| 10 | Role of Statistics in Research of Social Sciences | Mr. D. K.Mandavdhare | 46 |
| 11 | Election Studies in Maharashtra | Mr. Manish Sonawane | 50 |
| 12 | Recent Trend in Women Entrepreneurial Performance in India | Dr. S. D. Thore | 54 |
| 13 | सामाजिकशास्त्रातील संशोधन :अर्थ व उद्दिष्ट्ये | डॉ. ए.डी. पवार व डॉ. आर. के जाधव | 58 |
| 14 | सामाजिकशास्त्रातील संशोधन : अर्थ व उद्दिष्ट्ये | प्रा. बी. एल. शेलार | 62 |
| 15 | सामाजिकशास्त्रातील संशोधन : अर्थ व उद्दिष्ट्ये | प्रा.एन.ए. पाटील व प्रा. एन.डी. पगार | 66 |
| 16 | सामाजिक संशोधनाची आणि अर्थशास्त्रीय संशोधनाची उद्दिष्ट्ये | डॉ. टी. जी. सिराळ | 69 |
| 17 | सामाजिकशास्त्रातील संशोधनाची सद्यस्थिती, उद्दिष्ट्ये व महत्त्व | प्रा. अरुण शिंदे | 74 |
| 18 | सामाजिकशास्त्रातील संशोधनाचे महत्त्व | प्रा. प्रवीण शिंदे | 78 |
| 19 | सामाजिक संशोधन : वैशिष्ट्ये व प्रकार | डॉ. जी. बी. गावंडे | 83 |
| 20 | सामाजिक संशोधन वैशिष्ट्ये आणि व्याप्ती | प्रा. सी. डी. राजपूत | 86 |
| 21 | सामाजिक संशोधन एक दृष्टीक्षेप | डॉ. डी. एम. कदम | 89 |
| 22 | भारतातील सामाजिक संशोधन | डॉ. के. टी. खैरनार | 93 |
| 23 | सामाजिक संशोधनविषयक अडचणी | प्रा. डी. के कन्नोर | 97 |
| 24 | सामाजिकशास्त्रांचा कार्यात्मक सहसंबंध | प्रा. डी. सी. जाधव | 102 |
| 25 | राजकीय संशोधनाचे उद्देश | प्रा. एस. डी. गायकवाड | 104 |
| 26 | संशोधन अहवाल लेखनातील कौशल्ये | प्रा. एस. एम. आकाशे | 106 |
| 27 | औद्योगिक संशोधन | प्रा. उदय टेकें | 112 |
| 28 | राजकीय संशोधनातील अडचणी | प्रा. ए. पी. वनारसे | 117 |
| 29 | सामाजिक संशोधनातील सारणीचे महत्त्व व प्रकार | प्रा. कुणाल वाघ व प्रा. पी.आर. दिसागज | 119 |





Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 28 : सामाजिकशास्त्रातील संशोधन : सद्यस्थिती व दृष्टीकोन
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
January 2018

# औद्योगिक संशोधन

**उदय खंडू टेके**
सहायक प्राध्यापक, वाणिज्य विभाग
कला व वाणिज्य महाविद्यालय,येवला

**प्रस्तावना**

मानवाच्या अन्न,वस्त्र,निवारा,आरोग्य,शिक्षण व संदेशवहन या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी सतत प्रयत्नशील असणारा अर्थव्यवस्थेचा एक घटक म्हणून औद्योगिक क्षेत्राचा उल्लेख केला जातो. औद्योगिक क्षेत्रामध्ये मानवाच्या गरजा पूर्ण होतील अशा वस्तूंची निर्मिती केली जाते त्याचबरोबर त्याचे जगणे सुसह्य होईल अशा सेवा प्रदान केल्या जातात. वस्तुमध्ये सतत नाविन्यपूर्णता आणणे तसेच वैविध्यपूर्ण/वैशिष्ट्यपूर्ण सेवा प्रदान करणे व त्याद्वारे स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी औद्योगिक संस्था सतत प्रयत्नशील असतात. वस्तुमध्ये व सेवेमध्ये नाविन्यता वा विविधता आणण्यासाठी बाजारपेठ निरीक्षणाची, ग्राहकांच्या गरजांचे बदलते स्वरूप समजून घेण्यासाठी तसेच नवीन स्पर्धकांचा प्रवेश व अस्तित्वात असणाऱ्या स्पर्धकांचे धोरण समजून घेण्यासाठी संशोधनाची गरज असते.त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात 'संशोधन' हा अविभाज्य घटक बनला आहे.औद्योगिक क्षेत्रातील या अनुषंगाने केले जाणारे संशोधन हे औद्योगिक संशोधन म्हणून ओळखले जाते.

**संशोधन**

जिज्ञासा व ज्ञान संपादन करणे हि मानवाची मुलभूत प्रवृत्ती आहे.त्यासाठी तो आपल्या ज्ञानेंद्रियांचा वापर करून सभोवतालच्या परिस्थितीचे निरीक्षण करून विविध प्रकारचे अनुभव घेतो,प्रत्येक घटनेचा कार्यकारण भाव जाणून घेतो व त्याचा आपल्या जीवनात सुधारणा करण्यासाठी वापर करतो.मानवाची हीच प्रवृत्ती संशोधनास चालना देते.'संशोधन' या संकल्पनेच्या अनेक शास्त्रीय व्याख्या तज्ञांनी दिलेल्या आहेत. त्यातील काही व्याख्या पुस्तकीही आहेत. अशा शास्त्रीय अथवा पुस्तकी व्याख्यांच्या विचार करता 'संशोधन' या संकल्पनेचा सोपा व व्यावहारिक मथितार्थ जाणून घेणे महत्वाचे आहे. *संशोधन ही बौद्धिक प्रक्रिया असून तिच्या द्वारे नवीन ज्ञान प्रकाशात आणले जाते किंवा जुन्या ज्ञानातील उणीव अथवा त्रुटी प्रकाशात आणल्या जाऊन त्यात नवीन ज्ञानाची भर घातली जाते. संशोधनामध्ये उपलब्ध ज्ञानाची पातळी वाढवण्यासाठी एखाद्या विषयाचा पद्धतशीरपणे अभ्यास केला जातो. त्याद्वारे सत्याची तपासणी करून, आगोदर सापडलेल्या तत्त्वांची पुष्टी करून, नवीन तत्वे,विचार,संकल्पना,सिद्धांत मांडले जातात व भविष्यकालीन संशोधनासाठी दिशा दाखविली जाते.* संशोधनाचा वापर हा प्रत्येक क्षेत्रामध्ये केला जातो. समाज, उद्योग, शास्त्र, कला, संस्कृती या घटकामध्ये संशोधन करून नवनवीन संकल्पना, विचार, तत्वे उद्घोषित केली जातात. नाविन्य, शोध, सर्जनशीलता ही संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे अथवा ध्येये आहेत.

**औद्योगिक संशोधन**

औद्योगिक संशोधन ही संशोधनाची एक शाखा असून यामध्ये बाजारपेठांचा, ग्राहकांचा, स्पर्धकांचा, उपलब्ध वस्तू व सेवांचा विश्लेषणात्मक अभ्यास करून आपल्या वस्तुमध्ये, सेवेमध्ये नाविन्यता आणण्यासाठी माहिती, ज्ञान, पद्धती शोधल्या जातात. औद्योगिक संशोधन म्हणजे उद्योग,व्यवसाय व सेवा



Scanned by CamScanner

ISSN : 2348-7143
January 2018

क्षेत्रातील नाविन्य होय. नाविन्य म्हणजे असे काही,जे आजपर्यंत कोणालाही माहित नाही, आजपर्यंत कोणीही सादर केली नाही अशी वस्तू अथवा सेवा सादर करणे अथवा नाविन्य पूर्ण पद्धतीने वस्तू अथवा सेवा सादर करणे होय. वस्तूचे नूतनीकरण किंवा परिवर्तन म्हणजे संशोधन नव्हे. जुन्याच वस्तू थोड्याफार बदल करून, नवीन नाव देऊन ग्राहकांना उपलब्ध करून देणे म्हणजे 'संशोधन' असे तात्त्विकदृष्ट्या व तार्किकदृष्ट्या म्हणता येत नाही. एखाद्या विशिष्ट वस्तूचे नूतनीकरण करताना केवळ वरवरचे व उथळ बदल करण्यात येतात. वस्तूचे परिवर्तन करत असताना उपलब्ध वस्तूचा पूर्णतः कायापालट करणे, ग्राहकांकडून अपेक्षित असते परंतु जेव्हा असा कायापालट नवीन वस्तूमध्ये पूर्णतः आढळून येतो, तेव्हा ग्राहक नवीन वस्तूस संशोधित वस्तू म्हणून मान्यता देतात.

**इतिहास**

पुरातन काळापासून मानवाचे स्वतःच्या सुखसोयीसाठी व विश्वाविषयीच्या विशुद्ध ज्ञानलालसेमुळे संशोधन कार्य कळत नकळत चालू झाले. धनुष्यबाण, पाटा-वरवंटा, जाते, मातीची भांडी, कपडे, चाके, गाड्या, घरे, रस्ते, होड्या, धातू शुद्ध करणे व ओतणे, औषधे इ. सर्व गोष्टी माणसाच्या सुधारणा-प्रयत्नांचे पुरावे आहेत. जसजसे अधिकाधिक प्रयत्न होत गेले तसेच भाषा, लेखन, मुद्रण, दळणवळण ही वाढत गेली, तसतसा सुधारणेच्या प्रगतीचा वेग वाढू लागला. काही व्यक्ती केवळ ज्ञानलालसेने प्रेरित होऊन, उदा., आर्यभट (गणित, ज्योतिष), चरक (वैद्यक), कोपर्निकस, गॅलिलीओ, मूलगामी संशोधनाकडे वळल्या तर काहींच्या बाबतीत नजीकचा आर्थिक लाभ हे आकर्षण ठरले उदा., जेम्स वॉट, ओटो, डीझेल, एडिसन. कोळसा, लोखंड, पाणी, कापड वगैरेंचा वापर वाढू लागला व या वस्तू लवकर लवकर व मोठ्या प्रमाणात मिळाव्यात यासाठी ह्या व्यक्ती प्रयत्न करू लागल्या. या प्रयत्नांची परिणती सुमारे दोन-अडीचशे वर्षांपूर्वी इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीची सुरुवात होण्यात झाली. ही क्रिया इंग्लंडमध्ये सुरू झाल्यावर तिचा झपाट्याने पश्चिम व मध्य यूरोपातील देशांत व अमेरिकेत आणि नंतर रशिया व जपानमध्ये प्रसार झाला. आता ही औद्योगिक क्रांती आशिया व आफ्रिका या विकसनशील-अविकसित खंडांतही पसरत आहे. या क्रांतीच्या मुळाशी असलेल्या प्रयत्नांना पद्धतशीर स्वरूप मिळून उद्योगांची कार्यक्षमता व विविधता वाढण्यास मात्र विसावे शतक उजाडावे लागले. नवनव्या वस्तू, नवनवा कच्चा माल, नवनव्या कार्यपद्धती व नवनव्या सेवा पूर्ण विचाराने व पद्धतशीरपणे शोधून काढण्याच्या प्रयत्नासच पहिल्या महायुद्धानंतरच्या कालात औद्योगिक संशोधन हे नाव प्राप्त झाले.

**औद्योगिक संशोधनाचे महत्व**

जुन्याच वस्तू व सेवा अनेक वर्षे वापरून सर्वसाधारणपणे ग्राहक कंटाळतात. त्यांना सतत नवनवीन वस्तू व सेवा हव्या असतात. अशा नवनवीन ग्राहकाभिमुख वस्तूंचे/सेवांचे उत्पादन करणे व त्यांचा योग्य किमतीत ग्राहकांना हव्या असलेल्या जागी अखंडित पुरवठा करणे, हे औद्योगिक क्षेत्राचे सामाजिक कर्तव्य समजले जाते. अशा प्रकारे नवनवीन वस्तूंच्या/सेवांच्या निर्मितीसाठी संशोधनाची नितांत आवश्यकता असते. ग्राहकांच्या मनात आपल्या गरजा भागविणाऱ्या वस्तूंच्या काही कल्पना असतात त्या कल्पनांना वस्तू व सेवांच्याद्वारे मूर्त रूप देण्यासाठी औद्योगिक क्षेत्रात संशोधनाची आवश्यकता असते. उदा.आपले काम वेगाने व्हावे याबाबतच्या कल्पनेतूनच संगणकासारखे उत्पादन निर्माण झाले.आपला प्रवास वेगवान व्हावा या कल्पनेतूनच बुलेट ट्रेन,विमान यासारख्या वेगवान वाहतूक साधनांची निर्मिती



Scanned by CamScanner

झाली.ज्या संस्थांनी ग्राहकाभिमुख संशोधन, काळाची पावले कोणत्या दिशेने पडत आहेत, या वस्तुस्थितीचे आकलन न करता थांबवले, त्या संस्थांची उत्पादने साहजिकच कालवश झाली. उदा. 'नोकिया' या जगप्रसिद्ध मोबाईल कंपनीने संशोधनाकडे दुर्लक्ष केल्याने या कंपनीची बाजारपेठ 'सॅमसंग' या कंपनीने हस्तगत केल्याचे चित्र दिसते. याचाच अर्थ, संशोधन ही केवळ एक शास्त्रीय व मानवी प्रक्रिया नसून, ती काळाची गरज आहे.

**औद्योगिक संशोधनात पुढील प्रकारचे संशोधन केले जाते.**

- **वस्तू संशोधन**

वस्तू संशोधनामध्ये बाजारपेठेमध्ये उपलब्ध असलेल्या वस्तू आपली वस्तू याची तुलना करून आपली वस्तू स्पर्धक वस्तूपेक्षा वेगळी असेल,नाविन्यपूर्ण असेल यादृष्टीने संशोधन केले जाते.वस्तू संशोधनात उपभोक्ता कोणती वस्तू, केव्हा व कोठे विकत घेतात,एखादी वस्तू का खरेदी करतात किंवा एका वस्तूऐवजी दुसरी पर्यायी वस्तू निवडण्यामागील ग्राहकांची सुप्त प्रेरणा कोणती, याचा शोध घेण्याचा प्रयत्न असतो.या संशोधनाच्या आधारे बाजारपेठेत सतत नाविन्यपूर्ण वस्तू सादर केल्या जातात. संगणक,मोबाईल फोन स्मार्ट फोन,टेलिव्हीजन,मायक्रोवेव्ह ओव्हन,कॉम्पॅक्ट डिस्क,पेन ड्राईव्ह,सी.एफ.एल./एल.ई.डी वल्व.एम.पी.थ्री प्लेयर, इलेक्ट्रिक वाहने, सौरउर्जेवर कार्य करणारी साधने ई. हे वस्तू संशोधनाचे परिणाम आहेत.

- **सेवा संशोधन**

समाजाचे जगणे सुसह्य होण्यासाठी विविध प्रकारच्या सेवांची गरज असते,सेवांची निर्मिती व उपभोग एकाचवेळी होत असते.आज समाजाला विविध प्रकारच्या सेवांची गरज आहे.या सेवांमध्ये सुद्धा नाविन्य असणे गरजेचे असते हे नाविन्य आणण्यासाठी जे संशोधन केले जाते त्याचा समावेश सेवा संशोधनामध्ये होतो. सेवा उद्योगावर तंत्रज्ञानाचा प्रभाव दिसून येतो त्यातूनच नाविन्यपूर्ण सेवा उपलब्ध होतात.आज जगातील सर्वात मोठी टॅक्सी कंपनी उबर हिच्या स्वत:कडे एकही टॅक्सी नाही परंतु घरवसल्या उबरच्या माध्यामातून टॅक्सी बुक करता येते,अलीबाबा हि जगातील ऑनलाईन मार्केटिंग कंपनी तिचे स्वतःचे संग्रहण गृह नाही परंतु जगातील प्रत्येक उत्पादित वस्तू ग्राहकास घरपोहोच होते, 'एअर एन.बी.' हि संकेतस्थळावर असणारी कंपनी जिच्या द्वारे हॉटेलबुक करता येते परंतु या कंपनीच्या मालकीचे एक सुद्धा हॉटेल नाही.घरवसल्या प्रवासाची/चित्रपटाची तिकिटे बुक करणे,वीज बिल/विमा हप्ते/कर्जहप्ते भरणे, विविध वस्तूंची खरेदी करणे हे सर्व केवळ सेवा संशोधनामुळे शक्य झाले आहे.

- **ग्राहक वर्तणूक संशोधन**

कोणत्याही उद्योगाला यशस्वी व्हायचे असेल तर ग्राहकांचा पाठींबा हवा असतो त्यासाठी त्यांचा विश्वास जिंकावा लागतो,त्यासाठी ग्राहक वर्तणूक संशोधन माहिती उपलब्ध करून देते. यासाठी ग्राहकाचे मानसशास्त्र (कन्ज्युमर सायकॉलॉजी) या महत्त्वाच्या विषयाचे पूर्ण ज्ञान असणे अतिशय आवश्यक आहे. या संशोधनामुळे ग्राहकांची निर्णयप्रक्रिया कशी आहे, त्यांच्या आवडीनिवडी काय आहेत आणि त्या कशा बदलतात, त्यांच्या खरेदीमागे कोणत्या प्रेरणा (मोटिव्हस) आहेत इत्यादी घटकांची सखोल माहिती मिळते.या माहितीच्या आधारे ग्राहकाला आकृष्ट करण्यासाठी योजना आखता येतात उत्पादने, सेवा उपलब्ध करून देता येतात.सौंदर्य प्रसाधने,तरुण पिढीची उत्पादने,इलेक्ट्रिक उत्पादने या संशोधनाच्या आधारे संशोधित करता येतात.



Scanned by CamScanner

## भारतातील औद्योगिक संशोधनाची सद्यस्थिती

उदारीकरनानंतर वाढलेल्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी बहुतांश उद्योगांनी 'संशोधन व विकास विभाग'निर्माण केला आहे त्याद्वारे वस्तू संशोधन करून सातत्याने वस्तुमध्ये नवीनीकरण आणण्याचा प्रयत्न केला जात आहे, परंतु मुलभूत संशोधनाच्या बाबतीत स्थिती फारशी चांगली नाही. भारतीय उत्पादन म्हणून जगात ओळखल्या जाणाऱ्या उत्पादनांची संख्या अत्यल्प आहे. जगातील एकूण संशोधन खर्चातील ३०% खर्च अमेरिका करते. अमेरिका ही संशोधन, ज्ञान व शाश्वत मूल्ये यांचा त्रिवेणी संगम करून पुढची अनेक शतकं जगावर प्रभुत्व निर्माण करण्यात मग्न झाली आहे. संशोधन केल्याबद्दल तिथल्या कंपन्यांना करात सहा टक्के सवलत मिळते. उद्योगसमूह कर वाचवण्यासाठी संशोधन करत नाहीत, तर त्यांना संशोधनावर व ज्ञानावर आधारित समाज निर्माण करायचा आहे, म्हणून ते संशोधन करतात. त्यासाठी केवळ गुणवत्तेवरच तरुण शास्त्रज्ञांना संधी दिली जाते. त्यांना मोठ्या जबाबदाऱ्या दिल्या जातात. हे शास्त्रज्ञ चिनी अथवा भारतीय किंवा अजून कोणत्या वंशाचे आहेत हे पाहिलं जात नाही. त्यांना दूरदृष्टी आहे का व त्यांच्यात कर्तबगारी आहे का, एवढंच पाहिलं जातं. युरोप, जपान, चीन, दक्षिण कोरिया, सिंगापूर, स्वित्झर्लंड, इस्राईल हे एवढेच देश अमेरिकेशी सहकार्य अथवा स्पर्धा करून पुढची 500-700 वर्षं जगावर स्वामित्व निर्माण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यात गुंतले आहेत. अमेरिका, युरोप, चीन, जपान, स्वित्झर्लंडमध्ये असं काही नवीन संशोधन सुरू आहे, की ज्यामुळं येत्या 40-50 वर्षांत सारं विश्व बदलून जाईल परदेशी संशोधकांच्या सहकार्यानं मूलभूत संशोधन करण्यासाठी युरोपनं 52 अब्ज युरो (35 हजार कोटी रुपये) एवढी रक्कम ठेवली आहे. त्याचा फायदा जगातील कुणीही शास्त्रज्ञ घेऊ शकतात. भारतातले शास्त्रज्ञही घेऊ शकतात पण भारतातल्या इंग्रजी प्रसारमाध्यमांना 'भारत महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे व युरोपचं वाटोळं होणार आहे ' असला प्रचार करून स्वतःची पाठ थोपटण्यात मजा वाटते. युरोपमध्ये भारतातल्या व जगातल्या शास्त्रज्ञांसाठी कोट्यवधी रुपये उपलब्ध आहेत. अमेरिका व युरोप आपलं लक्ष कृत्रिम जीव, सौरऊर्जा, मानवाच्या मेंदूपेक्षा जास्त वेगानं विचार करणारे संगणक, गटारातल्या पाण्यापासून शुद्ध पाण्याची निर्मिती असे अनेक नवीन शोध लावून चौथी औद्योगिक क्रांती घडवून आणत आहेत व भारतातील उद्योगपती त्यांचे जुने-पुराणे समजले जाणारे, मोटारगाड्या उत्पादन करण्याचे कारखाने खरेदी करत आहेत. असले कारखाने विकत घेऊन भारतीय उद्योगपती स्वतःची संपत्ती चौथ्या औद्योगिक क्रांतीसाठी वापरायची सोडून जुन्या अर्थव्यवस्थेची अर्चना करण्यासाठी वापरत आहेत व आपला उच्चभ्रू वर्ग त्याला दाद देतो.स्टार्टअप,स्किल डेव्हलपमेंट,मेक इन इंडिया च्या माध्यमातून नवीन उद्योग/कल्पना राबविण्यासाठी वातावरण निर्माण करून दिले जात आहे,परंतु नोकर शाहीमुळे त्यामध्ये अडथळे निर्माण होतात.

जगातील या स्थितीला सामोरे जायचे असेल तर भारतीय उद्योगांनी उत्पादनक्षेत्रात (केवळ डिजिटल तंत्रज्ञानात नव्हे) नवनवीन संशोधन करणं गरजेचं आहे. जर प्रत्येक कंपनीला स्वतःचं संशोधन केंद्र उघडणं परवडणारं नसेल, तर काही उद्योजक एकत्र येऊन सामूहिक संशोधन केंद्रं स्थापित करण्याबद्दल विचार केला पाहिजे, उद्योगसमूह व विद्यापीठं यांनी संशोधन-सहकार्य करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. जगभर प्रगत देशांत विद्यापीठं पुढाकार घेऊन संशोधन-सहकार्य निर्माण करतात. शिक्षणपद्धती, औद्योगिक



Scanned by CamScanner

व शेतीचं उत्पादन, संगणकक्षेत्र व निसर्गाशी संबंधित पाणी आणि हवामान या क्षेत्रांना प्राधान्य देऊन त्यातलं मूलभूत संशोधन मोठ्या प्रमाणावर वाढवावं लागेल. भारतीय युवकांची गुणवत्ता परदेशी उद्योग संस्था ओळखतात उदा.सुंदरम् पिचई (सी.ई.ओ.-गुगल)सत्या नाडेला (सी.ई.ओ.-मायक्रोसॉफ्ट) शिव नाडर (चेअरमन-एच.सी.एल.) हे भारतीय वंशाचे युवक या उद्योग संस्थांचे नेतृत्व करतात. भारतात आजही कार्यक्षम, महत्त्वाकांक्षी गुणवान युवक आहेत या युवकांची संशोधन करण्याची क्षमता आहे त्यांना पाठिंबा द्यायला आपले उद्योगपती, राजकीय नेते, प्रसारमाध्यमं व शिक्षणसंस्था तयार झाल्या पाहिजेत.

**समारोप :**

अनेक संस्थांसमोर मूलतः संशोधन कसे करावे? हा प्रश्नच नसतो. त्यांना अद्ययावत संशोधन पद्धतीची व अन्य शास्त्रीय महत्त्वाच्या बाबींची पूर्ण जाणीव असते, तसेच संशोधनासाठी लागणारे कुशल व सक्षम मनुष्यबळ असते, आवश्यक असलेले वित्तीय पाठबळ असते, परंतु 'संशोधन कशावर करावे?' किंवा 'कशासाठी करावे ?' हाच यक्षप्रश्न असतो. अशा संस्थांसाठी संशोधन हाच संशोधनाचा विषय असतो. संशोधनासाठी नवनवीन, सर्जनशील व व्यावहारिक कल्पना सुचणे क्रमप्राप्त असते. कोणतीही संस्था मोठी किंवा छोटी आज संशोधनाशिवाय औद्योगिक क्षेत्रामध्ये प्रगती करू शकणार नाही. याचाच अर्थ संशोधन करावे किंवा न करावे, हा मुद्दा वादाचा असू शकत नाही. यासाठी 'संशोधन' 'नूतनीकरण' आणि 'परिवर्तन' या तीन संकल्पनांचे अचूक आकलन करावे. नवनवीन कल्पना सतत सुचणे आवश्यक आहे सर्वच कल्पना स्वीकारल्या जातीलच असे नाही सर्वच कल्पनांना अंतिमतः यश मिळेलच असे नाही. तथापि, अशा कल्पना सुचत राहणे हे संस्था संजीवन असण्याचे सुचिन्ह असते.

**संदर्भ :**

१. दै.सकाळ 'आलिया भोगासी असावे सादर' संदीप वासलेकर यांचा लेख दि.१७/०७/२०१७
२. दै.सकाळ 'संशोधन' -संदीप वासलेकर यांचा लेख दि.२२/०९/२०१७
३. दै.महाराष्ट्र टाइम्स 'औद्योगिक क्षेत्रात हवी संशोधन उद्यमशीलता' डॉ. धनंजय अवसरीकर यांचा लेख दि.२२/०७/२०१५
४. दै.महाराष्ट्र टाइम्स 'गोष्टी युक्तीच्या चार..'रतन टाटा यांचा लेख दि.१७/०२/२०१६
५. दै.लोकसत्ता 'कमतरता धनाची, की संशोधनाची?' दि.२५/०७/२०११
६. संशोधन पद्धती डॉ.प्रदीप आगलावे.
७. दै.लोकसत्ता 'संशोधनाच्या पद्धती ' डॉ. नचिकेत वेचलेकर, सहयोगी अधिष्ठाता, इंडसर्च, पुणे यांचा लेख दि.१४/०४/२०१४
८. http://mr.vikaspedia.in
९. Marketing Management- Dr.Philip Kotlar
१०. WWW.Wikipedeia
११. Marketing Management-Dr.K.Karuna.
१२. Research Methodology-Methods & Techniques- C. R. Kothari (2008)
१३. Research Methods- Ram Ahuja



Scanned by CamScanner